## दिनांक 17/03/2025

1 महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे 12/03/2025 रोजी 11:00 वा च्या सुमारास मौजे फिर्यादी यांचे राहते घरी आमशेत ता.महाड येथे कोणत्यातरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीचे हेतुने 48,000/-रुपये किमतीचे दागिने फिर्यादी यांच्या घरात लग्न कार्य असताना त्या गर्दिचा फायदा घेवुन स्वतःचे फायदयाकरीता चोरुन नेला.

याबाबत महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे गुरनं.30/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/मुंढे हे करीत आहेत.

2. रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 13/03/2025 रोजी 15:00 वा च्या सुमारास मौजे चोरढे ता मूरूड येथे, मुरूड येथे आरोपीत याने त्यांचे घराच्या लगतच्या जागेत लावलेल्या झाडाची फांदी फिर्यादी रा.चोरढे , मूरूड यांचे घराचे कौलांना लागत असल्याने फिर्यादी आरोपीत यांना म्हणाले कि, तूम्ही झाडाची फांदी तोडून टाका या गोष्टीचा आरोपीत यांनी मनात राग धरून आरोपीत क्र 1 याने फिर्यादी यांना ढकलून हाताबूक्कयाने मारहाण केली तसेच फिर्यादी यांचे उजव्या हाताचे अंगठयावर हाताने जोरात मारून गंभीर दूखापत केली. तसेच आरोपीत क्र.1 ते 4 यांनी आपसांत संगणमत करून फिर्यादी यांना हाताबूक्याने मारहाण करून जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे गुरनं.32/2025, भारतीय न्याय सहीता 2023 चे कलम 117(1),117(2),115(2),351(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ/ठाकूर हे करीत आहेत.

3. अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 16/03/2025 रोजी 01:00 वा च्या सुमारास मौजे वरसोली नांदे,पो,अदिवासी वाडी, ता.अलिबाग येथील फिर्यादी यांचे राहते घरी एकूण 22,500/-रुपये किंमतीचे मोबाईल,रोख रक्कम व चांदीचे दागिने कोणीतरी अज्ञात चोरटया इसमांनी फिर्यादी यांचे घरात कुलपासह कंडीकोयंडा उपकुन त्यावाटे घरात शिरुन घरफोडी चोरी केली.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं.50/2025, भारतीय न्याय संहिता 305,331(4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/पाटील हे करीत आहेत.

4. कोलाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 14/03/2025 रोजी 19:30 वा च्या सुमारास मौजे चिंचवली खोंडा आदिवासी वाडी ता.रोहा चिंचवली आदिवासी वाडी येथील वाडीतील साक्षीदार

याने आरोपी नं.01 यांचे मुलाला मारहाण केली होती त्यावरून त्यांचे भांडण झाले होते तो वाद मिटवण्याकरीता फिर्यादी यांचे पार्टीतील लोकांना आरोपीत यांनी तुम्ही संध्याकाळी मिटींग करीता या आपण झालेला वाद मिटवुन घेवु असे सांगीतले त्याप्रमाणे फिर्यादी यांचे सोबत असणारे लोक हे मिटींगकरीता गेले असता आरोपीत यांनी त्यांचे सोबत बाचाबाची करून भांडण सुरू केले व 15 आरोपीत यांनी एकत्रित गैरकायदयाची मंडळी जमवुन हातात काठया व सळई घेवुन फिर्यादी यांना शिवीगाळी करून काठीने सळईने हाताबुक्याने घरात घुसुन मारहाण करून जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

याबाबत कोलाड पोलीस ठाणे गुरनं.28/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 333, 118(1),189(1),189(2),191(1),191(2),191(3),190 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.सुर्यकांत भोजकर हे करीत आहेत.

5. पोलादपूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 16/03/2025 रोजी 06:30 वा च्या सुमारास मौजे पोलादपूर ते ओंबळी जाणा-या रोडवर ओंबळी गावच्या हद्दीत ता.पोलादपूर येथे आरोपीत याने त्यांचे त्याब्यातील लक्झरी बस क्र.एम एच 04- एल वाय 9199 ही रस्त्याचे परीस्थितीकडे दुर्लक्ष करुन अतिवेगाने, हयगयीने ,बेदरकारपने,चालवून समोरुन येणारी युनिकॉन मोटार सायकल क्र.एम.एच 04 के एन 8221 हीस ठोकर मारुन अपघात करुन मोटारसायकल वरील दोन्ही 1) राहुल श्रीरंग साळुंखे , वय 28, रा.ओंबळी ता.पोलादपूर 2) सिध्देश गणेश सकपाळ, वय 24, रा. ओंबळी ता.पोलादपूर यांचे लहान मोठया गंभीर स्वरुपाच्या दुखापती होवुन त्यांचे मरणास व दोन्ही वाहनाचे नुकसानीस कारणीभुत झाला.

याबाबत पोलादपूर पोलीस ठाणे गुरनं.17/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 184, भा.न्याय.सं.2023 कलम 106,281,125 (a),125 (b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.महाडिक हे करीत आहेत.

6. अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 14/03/2025 रोजी 15:30 वा च्या सुमारास मौजे रेवदंडा अलिबाग रोडवरील पालव फाटा बस स्टॉप येथे फिर्यादी रा.मेढेखार पो.पोयनाड, ता.अलिबाग यांची दुचाकी गाडी क्र.एमएच-06-सीजी-5051 ही चालवित काशिदबिच येथुन फिर्यादी यांच्या मेढेखार येथे घरी जात असताना फिर्यादी यांची दुचाकी रेवदंडा अलिबाग रोडवरील पालव फाटा बस स्टॉप येथे आलेवेली पालव बाजुकडुन आतील रस्त्यावरुन प्रवासी बस क्र 00-03- डी 9264 ही आरोपी चालक त्याच्या ताब्यातील सदर बस अचानकपणे भरधाव वेगात मुख्य रस्त्यावर आणुन फिर्यादी याच्या दुचाकीला डाव्या बाजुला ठोकर मारुन अपघात केला त्यामुळे फिर्यादी यांना दुखापत झाली आहेत. तसेच आम्ही रस्त्याच्या बाजुला पडलेले असताना साक्षीदार याने सदरची बस थांबवुन विचारणा केली असता तेथे बस मधील काही प्रवासी यांनी त्याच्या सोबत झटापट केली आहे तसेच आम्ही इथले स्थानिक गावातले आहोत तुम्हाला मारायला गावातली मुले बोलवु अशी धमकी दिली.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं.51/2025, भारतीय न्याय संहिता 281,125(A)

125(B),115(2)324(4),324(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/मातेरे  हे करीत आहेत.

7.    कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 16/03/2025 रोजी 17:15 वा च्या सुमारास मौजे .बामचामाळा, आकुर्ले येथील क्रिकेट ग्राउंडवर ता.कर्जत येथे फिर्यादी व साक्षीदार हे बामचामाळा येथील क्रिकेट ग्राउंडवर क्रिकेट खेळत असताना आमराई येथे राहणारा 03 असे सदर ठिकाणी येवुन फिर्यादी व शाबुद्दीन शेख यांचमध्ये झालेले भांडणाचा राग मनात ठेवुन आरोप नं.01 जाधव याने फिर्यादी यांना शिवीगाळी करुन त्याचे हातातील बॅट व स्टँम्पने फिर्यादी यांचे पाठीवर व दोन्ही पायावर मारुन दुखापत केलेली आहे.तसेच त्याचे सोबत असलेले इतर दोन अनोळखी इसम यांनी देखील फिर्यादी रा.साईहंसा अपार्टमेंट रुम नं.03 कोकणआळी दहिवली,ता.कर्जत यांना हाताबुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळी व मारण्याची धमकी दिली.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं. 78/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 118(1), 115(2), 352, 351(2), 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/भोईर  हे करीत आहेत.

8.  पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/01/2022 रोजी 00:00 वा ते दि. 16/03/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान  मौजे मुक्ताईनगर व इमर ठिकाणी पेण येथे महिला फिर्यादी यांचे आरोपीत नं.01 हे नात्याने पती असुन त्यांना त्यापासुन एक आपत्य आहे आरोपीत नं.2 व 3 हे नात्याने सासुसासरे असुन फिर्यादी यांना वेळोवेळी आरोपीत नं. 1 ते 3 यांनी कोणत्याना कोणत्या कारणावरुन मानसीक त्रास देवुन तसेच फिर्यादी यांचे कुटंुबीयांना वारंवार शिविगाळी करुन जीवेठार मारण्याची धमकी देवुन फिर्यादी यांच्या चारीत्र्यावर संशय घेवुन त्यांची आब्रू नुकसानी करुन मानसिक त्रास दिला.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं.44/2025 भा.दं.वि.क.85,356,352,3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास  मपोसई/श्रीम.वेंगुर्लेकर  हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 16.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 265 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून  2,50,900/-रुपये इतका दंड आकारला आहे.